# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक १८/०६/२०२३ (रविवार)

---

## दुखापत

पोलीस स्टेशन काटोल :– अंतर्गत मौजा डोगंरगाव ०८ किमी दक्षिण. दिनांक १७.०६.२३ चे ०७.०० वा ते ०८.०० वा दरम्यान, यातील फिर्यादीने आरोपी कडुन त्याचे मुलीच्या उपचाराकरीता एक लाख रुपये दिले होते, फिर्यादिला आरोपीने म्हटले की, “एका महिन्यात तुझे पैसे परत देतो” यातील आरोपी व त्याचा भाउ विक्की असे सोबत मिळुन फिर्यादिला पैसे मागण्यास गेले, असता फिर्यादिने म्हटले की, मी तुझे पैसे परत थोडे थोडे करुन परत देतो, असे म्हटले असता गुलाब राजपुत याने फिर्यादिच्या हाताच्या तर्जनीवर काठीने मारुन जख्मी केले व रक्त निघाले पुन्हा शिवीगाळ केली.

सदर फिर्यादी नामे– नागेश ज्ञानेश्वर पवार रा डोंगरवार ता काटोल यांचे रिपोर्टवरून पोस्टे काटोल येथे आरोपी नामे– गुलाब अमड्या राजपुत यांचे विरूध्द कलम ३२४, ५०४ भादवी अन्वयें चा गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि अशोक मेश्राम पोस्टे काटोल हे करीत आहे.

## घरफोडी

पोलीस स्टेशन खापरखेडा :– अंतर्गत भास्कर ब्रिक्स कंपनी चिचोली लोन खैरी १३ कीमी पश्चिम. यातील फिर्यादी हा १७ वर्षापासून भास्कर ब्रिक्स कंपनी चिचोली लोणखेरी येथे सुपरवायझर चे काम करतो. कोणीतरी अज्ञात चोराने शेतात असलेल्या कंपनीच्या खोलीमध्ये दाराचे कुलूप तोडून आत प्रवेश करून (१) २० एच पी क्रॉमटन मोटर किंमती २०००/–रु. (२) १५ एच पी क्रॉम्टन कीं. २०००/– रु. (३) ३ एच पी क्रॉमटन मोटर कीं. २०००/– रु. (४) १ एच पी क्रॉम्टन मोटार किमती १०००/– रु. (५) पाण्याची मोटार ३ एच पी क्रॉम्टन मोटार किमती १०००/–रु. (६) लोखंडी ग्रील एक किमती ३००/– रु. (७) मशीनचे साचे तीन नग किमती १५०० /–रु. (८) मशीनचा कॉपर वायर जुना तीन नग बंडल अंदाजे किंमत १५००/–रु. असा एकूण ११,३००/– रु माल दिनांक १३/६/२३ चे ०१/०० वा.ते १४/६/२३ चे ०२/०० वा दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शरद पुंडलिक घोरपडे वय ५० वर्ष रा. प्रवीण दूध डेरी जवळ महादुला तालुका कामठी यांचे रिपोर्टवरून पोस्टे खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ४५४, ४५७, ३८० भा द वी. अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास– पो उपनि डोंगरे पोस्टे खापरखेडा हे करीत आहे